श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

ऑगस्ट २०२४ | वर्ष – १२ अंक – ८ | मासिक, पाने १२ | Regn.No. - MAHMAR/2022/86035

## वालावलकर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात 'डॉक्टर्स डे' उत्साहात साजरा




*संगीत-संध्येत सहभागी विद्यार्थ्यांसमवेत डीन मानसिंग घाटगे, डॉ. नेताजी पाटील आणि अध्यापकवर्ग*

भारतभर दि. ०१ जुलैला साजरा केला जाणाऱ्या 'डॉक्टर्स डे'च्या निमित्ताने बी. के. एल. वालावलकर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात 'Melody Mania' या संगीत-संध्येचे आयोजन करण्यात आले होते. मेडिकल कॉलेज तसेच हॉस्पिटलमध्ये कार्यरत असणाऱ्या डॉक्टरांनी आणि विद्यार्थ्यांनी आपली गायनकला ह्या कार्यक्रमात सादर केली.

ह्या कार्यक्रमासाठी वैद्यकीय संचालिका डॉ सुवर्णा पाटील तसेच मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. मानसिंग घाटगेसर ह्या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते. त्याचबरोबर डॉ. नेताजी पाटील, डॉ. अरविंद यादव, डॉ. विजय डोंबले, डॉ. प्रसन्ना नकाते, डॉ. अविनाश लुकडे, डॉ. योगेंद्र शेळके, डॉ. रणजित वाघ, डॉ. अविनाश बोरकर, डॉ. लक्ष्मण फड, डॉ. संगीता वंजारी, डॉ. जयश्री जानकर, डॉ. अनिल कुरणे इ. उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने ह्या कार्यक्रमाची सुरुवात झाली. ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुणाल वरकड आणि सृष्टी पाटील ह्या दोन विद्यार्थ्यांनी केले. त्यासाठी लागणारी सर्व मदत डॉ. अद्वैत गोडसे यांनी केली. डॉ. अविनाश वाघमोडे, डॉ. सूर्यकांत इंगळे, डॉ. मिहीर बैराट, डॉ. वैदेही देशपांडे, डॉ. धिरज बोर्डे, डॉ. चेतन सकटे, आणि तनुश्री, प्रणव, पीयूष, श्रावणी, श्रद्धा यानी त्यांच्या सुमधुर आवाजाने कार्यक्रमाची रंगत वाढवली.

## वालावलकर रुग्णालयात ७२००हून अधिक रुग्णांना 'महात्मा फुले जन आरोग्य योजने'अंतर्गत पूर्णपणे मोफत उपचारांचा लाभ

सावर्डे येथील वालावलकर रुग्णालय हे कोकणातील जनतेसाठी वरदान ठरले आहे. गेल्या वर्षी ७२००हून अधिक रुग्णांना महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत पूर्णपणे मोफत उपचारांचा लाभ मिळाला आहे. वालावलकर रुग्णालयामध्ये हृद्रोग, कॅथलॅब, मूत्रविकार आणि डायलिसिस, शस्त्रक्रिया विभागात १२ ऑपरेशन थिएटर्स, मेडिकल-सर्जिकल-बालरोग-नवजात अर्भक असे १०० बेडचे अतिदक्षता विभाग, केमोथेरपी, रेडियो थेरपी, कॅन्सर शस्त्रक्रिया अशा अनेक यंत्रणांनी सज्ज स्वतंत्र कर्करोग विभाग, असे

अनेक विभाग उपलब्ध आहेत. यामध्ये गतवर्षी ६४२ हृदयविकार रुग्णांना अँजिओप्लास्टी आणि बायपास शस्त्रक्रियेमुळे जीवदान मिळाले आहे. त्याचबरोबर विविध प्रकारच्या कर्करोगांचे साडेतीन हजार रुग्ण केमोथेरपी योजनेचा लाभ घेत आहेत तर रेडिएशन उपचार पद्धतीचा ३१५ रुग्णांना लाभ झाला आहे. तसेच २८०हून अधिक रुग्णांवर कॅन्सर शस्त्रक्रिया केल्या गेल्या.

अशाप्रकारे १५०० हून अधिक रुग्णांवर विविध प्रकारच्या क्लिष्ट शस्त्रक्रिया केल्या गेल्या. ह्यामध्ये मुतखड्यामुळे मूत्रपिंड निकामी झालेल्या ४४५ लोकांना जीवदान मिळाले आहे. याशिवाय विविध प्रकारच्या पोटाच्या कॅन्सरच्या शस्त्रक्रिया तसेच हाडांच्या, नाक-कान या शस्त्रक्रिया या योजनेत समाविष्ट आहेत. यकृत आणि स्वादुपिंड आजारांमुळे त्रस्त अशा १००पेक्षा जास्त रुग्णांना एंडोस्कोपी आणि दुर्बिणीद्वारे उपाय केल्यामुळे दिलास मिळाला आहे.

अतिगंभीर मेडिसिन व बालरुग्ण यांनाही योजनेचा लाभ मिळून त्यांचा जीव वाचण्यास मदत झाली आहे. रुग्णालय हे कोकणातील एकमेव परिपूर्ण अद्ययावत मल्टी स्पेशालिटी रुग्णालय असून यात विविध शाखांचे ३००हून अधिक तज्ज्ञ डॉक्टर्स येथे कायमस्वरूपी उपलब्ध आहेत. त्यामुळे रात्री-अपरात्रीदेखील उपचार करणे सहज शक्य होते. संपूर्ण रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड जिल्ह्यातून तर रुग्ण उपचारासाठी येतातच; पण त्याशिवाय कोल्हापूर, सातारा, मुंबई, पुणे येथूनही रुग्ण योग्य उपचाराकरिता हॉस्पिटलला भेट देत आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच केशरी व पिवळ्या रेशन कार्डधारकांना या योजनेचा लाभ घेता येतो. योजनेत समाविष्ट रुग्णांचे पूर्ण उपचार तर होतातच; शिवाय रुग्ण योजनेत समाविष्ट असेपर्यंत जेवणाची मोफत सोयही देण्यात येते. डायलिसिस विभाग ११ हिमोडायलिसिस यंत्रे, आर.ओ. प्लांटने सज्ज असून मागील वर्षी ४८० रुग्णांना डायलिसिस सुविधेचा लाभ मिळालेला आहे.

हा विभाग निरंतर सेवा देऊ शकेल याकरिता डायलिसिस तंत्रज्ञ प्रशिक्षणाची सोय केली आहे. कोकणातील शेकडो विद्यार्थ्यांनी हे प्रशिक्षण घेऊन स्वावलंबी होण्याचा प्रयत्न केला आहे. लकवा व इतर मेंदू विकाराचे १२३ रुग्ण या योजनेचे लाभार्थी आहेत. रुग्णालयातील आर्थिकदृष्ट्या दुर्बलांसाठीदेखील अनेक योजनांमुळे रुग्णांचे निदान होते आणि निदानासाठी आवश्यक असणाऱ्या तपासण्यांसाठी लागणारा निधी उपलब्ध होऊन लवकर निदान आणि योग्य उपचारामुळे रुग्णाचे आयुष्य वाढते.

वालावलकर रुग्णालयाच्या रूपाने आधुनिक वैद्यकीय उपचारपद्धती गोरगरीब रुग्णांच्या दारात, त्यांच्या गावात उपलब्ध झाल्यामुळे आता त्यांना जगण्यासाठी आशेचा किरण दिसू लागला आहे आणि या निमित्ताने सावर्डे आणि आजूबाजूचा परिसर विकासाची फळे चाखू लागला आहे.

## माजी आरोग्यसेवा संचालक, महाराष्ट्र राज्य, डॉ. प्रकाश डोके यांचे व्याख्यान



*माजी आरोग्यसेवा संचालक, महाराष्ट्र राज्य, डॉ. प्रकाश डोके व्याख्यान देताना*

भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या 'जनऔषध वैद्यकशास्त्र' विभागातर्फे माजी आरोग्यसेवा संचालक, महाराष्ट्र राज्य, डॉ. प्रकाश डोके यांचे व्याख्यान दि. १० जुलै २०२४ रोजी आयोजित करण्यात आले होते. विभागातील शिक्षकवर्ग, पदव्युत्तर विद्यार्थी आणि तृतीय वर्ष एम.बी.बी.एस.चे विद्यार्थी यांच्याशी डॉ. डोके यांनी 'वैद्यकीय शिक्षणामध्ये सार्वजनिक आरोग्य या विषयाचे महत्त्व' या विषयावर संवाद साधला. डॉ. डोके यांनी वैद्यकीय शिक्षणातील तसेच आरोग्य व्यवस्थापन क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव मांडून सार्वजनिक आरोग्य या विषयाचे महत्त्व उपस्थित श्रोत्यांना पटवून सांगितले. चर्चासत्रामध्ये विद्यार्थांनीदेखील उत्स्फूर्त सहभाग घेतला. वैद्यकीय संचालक डॉ. सुवर्णा पाटील यांच्याशी झालेल्या चर्चेमध्ये डॉ. डोके यांनी संस्थेतर्फे कोणतेही संशोधन प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी शासन स्तरावर तसेच संशोधन अनुदान प्राप्त करण्यासाठी केंद्रिय स्तरावर आणि यु.एन. एजन्सी स्तरावर प्रयत्न करण्यासाठी सहकार्याचे आश्वासन दिले.



*डॉ. प्रकाश डोके विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सोबत डॉ. गजानन वेल्हाळ,*

## वालावलकर रुग्णालयात ‘स्लीप लॅब’ उपलब्ध



श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित भ.क.ल. वालावलकर रुग्णालय येथील ई.एन.टी. विभागात ‘स्लीप लॅब’ नुकतीच कार्यान्वित करण्यात आली आहे. ही फिलिप्स कंपनीची अतिशय उच्च दर्जाची स्लीप लॅब आहे.

रात्री झोपेत घोरणे ही केवळ एक समस्या नसून हा अनेक मोठ्या रोगांना निमंत्रण देणारा त्रास आहे. आजकालच्या दगदगीच्या जीवनामध्ये आपण दुर्लक्षित करणारी गोष्ट म्हणजेच पुरेशी शांत झोप आणि शांत झोप न लागण्याचे कारण म्हणजेच श्वास बंद होणे, जोडीदाराचे घोरणे व रात्री येत असलेले विविध आवाज! आपल्याला जर पुरेशी ६-७ तासांची शांत झोप मिळाली नाही तर मग ते इतर मोठ्या रोगांना आमंत्रण ठरते. पण बऱ्याचदा आपल्या हे लक्षात येत नाही की आपल्याला झोपेमध्ये श्वास घ्यायला त्रास होतो आहे का ? दिवसभरात खूप झोप येण्याचे कारण काय ? आणि याच गोष्टीचे निदान होणे गरजेचे आहे. हे निदान करण्यासाठी झोपेचा शास्त्रोक्त अभ्यास करावा लागतो. त्यामुळे श्वासामुळे, मेंदूमुळे, हृदयामुळे, पोटाच्या घेरामुळे होणाऱ्या घोरण्याच्या त्रासाचे निदान करता येते.

स्लीप स्टडीची अद्ययावत सुविधा कोकणामध्ये फक्त वालावलकर रुग्णालयात उपलब्ध आहे. या स्टडीसाठी रुग्णाला आरामदायक वाटावी अशी संलग्नित संडास बाथरूम असलेली एसी रूम देण्यात येते. पेशंटला एक रात्र हॉस्पिटलमध्येच झोपावे लागते व दुसऱ्या दिवशी सकाळी लगेच त्याचा रिपोर्ट मिळतो. घोरण्याचे निदान खूप गरजेचे आहे. एकदा त्याचे निदान झाले की मग आपल्याला त्याची पुढील ट्रीटमेंट वालावलकर हॉस्पिटलमध्ये चालू केली जाते.

घोरण्याच्या त्रासाकडे दुर्लक्ष केले तर आपणास खालील धोके संभवतात :

१) कमी वयात उच्च रक्तदाब
२) पक्षाघाताचा आघात ३) हृदयविकाराचा झटका
४)चिडचिडेपणा ५) स्मृतिभ्रंश ६) रस्त्यावरच्या अपघाताच्या प्रमाणात वाढ

त्यामुळेच घोरण्याचा त्रास असलेल्या रुग्णांनी लवकरात लवकर त्याचे निदान करण्यासाठी वालावलकर रुग्णालयातील कान, नाक व घसा तज्ज्ञाला दाखवून ‘स्लीप स्टडी’ करून घ्यावी जेणेकरून मोठ्या रोगाला आपण निमंत्रण देणार नाही. ही सर्व माहिती वालावलकर हॉस्पिटलचे कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. राजीव केणी व डॉ. प्रतीक शहाणे यांनी दिली.

## आयुष्मान भारत मिशन – महाराष्ट्र समितीची आढावा बैठक

‘आयुष्मान भारत मिशन’च्या महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दि. १६ मे २०२४ रोजी वालावलकर हॉस्पिटलमध्ये आढावा बैठक आयोजित केली होती. या बैठकीला तालुका आरोग्य अधिकारी (THO) डॉ. ज्योती यादव, जिल्हा आरोग्य अधिकारी (DHO) आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील सहकारी उपस्थित होते. डॉ. ओमप्रकाश शेटे, आयुष्मान भारत-मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख आरोग्यसेवा नेता आहेत. दर्जेदार आरोग्यसेवा प्रत्येकासाठी, सर्वत्र उपलब्ध करून देणे हे त्यांचे एक मिशन आहे

आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्राचे प्रमुख या नात्याने, दुर्गम खेड्यांपासून ते गजबजलेल्या शहरांपर्यंत लाखो लोकांवर होणारा परिणाम पाहणे, ‘सर्वांसाठी आरोग्यसेवा’ हे केवळ आश्वासन न देता प्रत्यक्षात आणणे हा डॉ. शेटे यांचा ध्यास आहे. डॉ. शेटे यांनी वालावलकर हॉस्पिटलमध्ये सुरू असलेल्या ‘महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने’बद्दल कौतुक व्यक्त केले.



*डॉ. ओमप्रकाश शेटे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना डॉ. सुवर्णा पाटील*

# डॉ. बिना जोशी (Scientist G) यांचे व्याख्यान




*डॉ. बिना जोशी आपले विचार मांडताना*

भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या 'जन औषध वैद्यकशास्त्र' विभागातर्फे 'आय.सी.एम.आर. राष्ट्रीय प्रजनन आणि बाल आरोग्य संशोधन संस्था, मुंबई'च्या उपसंचालक (Scientist G) आणि प्रवर्तन संशोधन आणि Implementation Research विभागाच्या ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख डॉ. बिना जोशी यांचे व्याख्यान दिनांक ३०/०५/२०२४ रोजी आयोजित करण्यात आले होते. सर्व विभागातील प्राध्यापक वर्ग आणि पदव्युत्तर विद्यार्थी यांच्याशी डॉ. बिना जोशी यांनी 'Implementation Research' या विषयावर संवाद साधला. डॉ. जोशी यांनी प्रवर्तन आणि Implementation Research मध्ये केलेले संशोधन तसेच त्यांचा या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव मांडून "Implementation Research' या विषयाचे महत्त्व आणि सविस्तर माहिती उपस्थितांना पटवून सांगितली. चर्चासत्रामध्ये प्राध्यापक वर्गाने आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी देखील उत्स्फुर्त सहभाग घेतला. Implementation Research मुख्यत्वे हेल्थकेअर प्रोफेशनल आणि सपोर्ट स्टाफ, हेल्थकेअर संस्था, हेल्थकेअर ग्राहक आणि धोरणकर्त्यांचे वर्तन समजून घेण्याचा प्रयत्न करते आणि या सर्वांचा समन्वय साधून कार्यक्रम अंमलबजावणी लाभार्थी स्तरावर सक्षमपणे राबवण्यासाठी मार्गदर्शन करते. मा. संचालक, डॉ. सुवर्णा पाटील यांच्याशी झालेल्या चर्चेमध्ये संस्थेतर्फे कोणतेही संशोधन प्रकल्प व त्यासाठी लागणारे अनुदान प्राप्त करण्यासाठी भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद स्तरावर आणि जागतिक आरोग्य संघटना स्तरावर प्रयत्न करण्यासाठी सहकार्याचे आश्वासन त्यांनी दिले.

# 'वालावलकर हॉस्पिटल लेप्टो ड्राईव्ह ' – 'नेमेची येणारा' एक पावसाळी उपक्रम





पावसाळ्यात लावणी दरम्यान शेतात जास्त वेळ चिखलात किंवा तत्सम कामे केल्याने आपल्या हातापायाच्या भेगा किंवा नाक किंवा डोळ्यात जंतुयुक्त पाणी शिरल्यास स्नायूंमध्ये ह्या जंतूंची झपाट्याने वाढ होते आणि मग अंग दुखणे, डोकेदुखी, ताप अशी लक्षणे दिसू लागतात. जर किरकोळ औषधाने रोगाचा प्रतिकार झाला नाही तर मात्र रोग गंभीर रूप धारण करतो आणि मग न्युमोनिया, मूत्रपिंड निकामी होणे, प्लेटलेट्स कमी होणे अशी गुंतागुंत निर्माण होते. ज्या रुग्णाला मधुमेह, उच्च रक्तदाब, कुपोषण असे दीर्घ आजार असतात त्यांच्यामध्ये हा आजार जीवाला धोका निर्माण करू शकतो. हे टाळण्याकरता सुरवातीपासूनच पायाच्या भेगांवर उपचार आणि शेतीची कामे संपल्यावर स्वच्छ आंघोळ, साबणाने हातपाय धुणे हे आवश्यक आहे. पण लेप्टोस्पायरोसिसची वृद्धी होऊ नये म्हणून 'डॉक्सिक्लिन' नामक केवळ दोन गोळ्या आठवड्यातून एकदा लावणी सुरू झाल्यापासून घेतल्यास प्राथमिक प्रतिबंध शक्य आहे. किंबहुना २०१२ साली वालावलकर रुग्णालयाने डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्विसेस, महाराष्ट्र राज्य यांच्यासोबत या विषयावर बरेच संशोधन केले आहे आणि तेव्हापासून डॉक्सीचे वाटप एक प्रतिबंधात्मक उपाय म्हणून गेल्या दहा वर्षांपासून सुरू केले आहे आणि त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. म्हणून मग 'लेप्टो ड्राईव्ह' या नावाने हा कार्यक्रम प्रतिवर्षी पावसाळ्यात ग्रामीण शेतकऱ्यांकरिता राबवला जातो. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही या लेप्टोस्पायरोसिस ड्राइव्हमध्ये वालावलकर रूरल मेडिकल कॉलेजचा

कम्युनिटी मेडिसिन विभाग, ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयासह ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र-डेरवण, नागरी आरोग्य प्रशिक्षण केंद्र-चिपळूण, कम्युनिटी विभाग वालावलकर हॉस्पिटल यांनीही खूप महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

भ.क.ल. वालावलकर रुग्णालय २०१२पासून डॉक्सीचे वाटप करत आहे. भातलावणी हंगामादरम्यान ह्या गोळ्या दिल्या जातात. गरोदर माता व लहान मुलांनी मात्र ह्या गोळ्यांचे सेवन टाळावे. दशकापासून सुरू असलेल्या या मोहिमेदरम्यान, भ. क. ल. वालावलकर रुग्णालय, डेरवणमार्फत सुमारे ६२१७ ग्रामस्थांना डॉक्सीचे वाटप केले आहे. डॉक्टर, नर्सिंग स्टाफ, सोशल वर्कर्स व रुग्णलयातील इतर कर्मचारी असे ३० ते ३५ जणांचे पथक दररोज या प्रभावित भागात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार, औषध वाटप या प्रकारे सेवा देत आहेत. तसेच लोकांमध्ये लेप्टोस्पायरोसिसची लक्षणे, संसर्गाचे मार्ग आणि त्याचे व्यवस्थापन/प्रतिबंध कसे करावे याबद्दल जागरुकता वाढवत आहेत.

आतापर्यंत डेरवण, कोसबी, हडकणी, नांदगाव, टेरव, मिरजोळी, मुरादपूर, कापसाळ, अडरे, खेर्डी, चिंचगिरी अशा बऱ्याच गावातील ३१३१ लाभार्थ्यांनीही याचा लाभ घेतला. हा उपक्रम वालावलकर रुग्णालयातर्फे एक सामाजिक बांधिलकी म्हणून पूर्णतः मोफत राबण्यात येत आहे. त्यामुळे आजतागायत अनेक शेतकरी लेप्टोस्पायरोसिसपासून बचावले आहेत. उपक्रमाला योग्य पाठिंबा दिल्याबद्दल रुग्णालय शासनाचे ही आभारी आहे.

## वालावलकर रुग्णालय व महाविद्यालय येथील ए.आर.टी. सेंटरचा गुरुप्रसाद संस्थेमार्फत गौरव.



*श्री. मिलिंद राजवाडे यांच्या हस्ते संस्थेला सन्मानचिन्ह प्रदान*

दि. ५ जानेवारी २०२१ रोजी, वालावलकर रुग्णालय व महाविद्यालय, डेरवण येथे ए.आर.टी. सेंटरचा लोकार्पण सोहळा पार पडला होता. मागील तीन वर्षात या ए.आर.टी. सेंटरच्या माध्यमातून रत्नागिरी आणि पंचक्रोशीतील १०००हून अधिक एड्सग्रस्त व एच.आय.व्ही. बाधितांवर शासकीय मार्गदर्शक तत्त्वांना अधीन राहून योग्य औषधोपचार तसेच समुदेशन करण्यात आले आहे.

या ए.आर.टी. सेंटरची उल्लेखनीय कामगिरी लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेने राज्यात इतरत्र नव्याने सुरू होणाऱ्या व खाजगी व सरकारी भागीदारी तत्त्वावर चालणाऱ्या ए.आर.टी. सेंटरना मार्गदर्शन करण्यासाठी रिसोर्स पर्सन म्हणून डॉ. योगेंद्र शेळके, मायक्रोबायॉलॉजिस्ट प्राध्यापक यांना दि. १४ मार्च २०२४ला औरंगाबाद येथे आमंत्रितही करण्यात आले होते.

भारतात एड्स नियंत्रण संस्थेमार्फत अँटी रेट्रोव्हायरल थेरपी सेन्टर सुरू होऊन २० वर्षे झाल्याच्या निमित्ताने वालावलकर रुग्णालय व महाविद्यालय डेरवण यांच्या ए.आर.टी. सेंटरच्या कामकाजाची पोचपावती म्हणून, या ए.आर.टी. सेंटरला श्री. मिलिंद राजवाडे यांच्या हस्ते, एड्सग्रस्त व एच.आय.व्ही. बाधितांसाठी काम करणाऱ्या रत्नागिरी येथील गुरुप्रसाद संस्थेमार्फत सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

### ए. आर. टी. सेंटरच्या कामकाजाची संक्षिप्त माहिती

| | |
|---|---|
| एकूण एच.आय.व्ही. बाधितांची नोंदणी | ११७० |
| मृत्यू (ए. आर. टी. सेंटरच्या प्रारंभापासून) | ९० (७.६९%) |
| लॉस टू फॉलो अप (LFU) | ०४ (०.३७ %) |
| एकूण ए.आर.टी. औषधोपचार घेत असलेले रुग्ण (Alive on ART) | १०७६ - ट्रान्सफर आऊट व मृत्यू वगळून |
| एकूण प्रौढ रुग्ण (PLHIV Adults) | N=१०५३ |
| पुरुष | ४८७ |
| महिला | ५६६ |
| लहान मुले (PLHIV Pediatrics) | N=२३ |
| पुरुष | १४ |
| महिला | ०९ |
| एकूण व्हायरल लोड टेस्टिंग (मार्च २०२३ - एप्रिल २०२४) | १०२० |
| व्हायरल लोड नियंत्रित (Virally suppressed) | १०११ (९९.११%) |



## ‘आहार क्रांती : उत्तम आहार, उत्तम विचार’ – ग्लोबल इंडियन सायंटिस्ट्स अँड टेक्नोक्रॅट्स फोरम



*डॉ. सुवर्णा पाटील व डॉ. येल्लोजीराव मिरजकर सामंजस्य करार करताना*



*डावीकडून डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. ज्योती अय्यर, डॉ. आनंद जोशी, श्री. श्रीपती वालावलकर, श्री. विकास वालावलकर, डॉ. येल्लोजीराव मिरजकर, श्री. नंदकुमार पालकर, श्री. चारुदत्त जोगळेकर, डॉ. नेताजी पाटील.*

‘ग्लोबल इंडियन सायंटिस्ट्स अँड टेक्नोक्रॅट्स फोरम’ ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आणि डेरवण येथील बी.के.एल. वालावलकर वैद्यकीय महाविद्यालय यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारान्वये प्राध्यापक/विद्यार्थी देवाणघेवाण, आहार, स्थानिक फळे आणि भाज्यांची उपचार शक्ती आणि त्याचे फायदे, संतुलित आहार तसेच संशोधन अभिरुची विकसित करण्यासाठी संशोधनपर लेख, पेपर्स, पुस्तकांचे प्रकाशन आणि ज्ञानविश्वात योगदान देणे अशा विविध उपक्रमांचे आयोजन दोन्ही संस्था एकत्रितपणे करणार आहेत.

ग्लोबल इंडियन सायंटिस्ट्स अँड टेक्नोक्रॅट्स फोरम या संस्थेचे आंतरराष्ट्रीय संयोजक डॉ. येल्लोजीराव मिरजकर (अमेरिका) व सचिव श्री. नंदकुमार पालकर यांनी नुकतीच २४ जून रोजी आपल्या संस्थेला भेट दिली व विविध प्रकल्पांची पाहणी केली. डॉ. सुवर्णा पाटील व डॉ. येल्लोजीराव यांनी दोन्ही संस्थामधील सामंजस्य करारावर सह्या केल्या. त्या वेळी वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. अरविंद यादव, डॉ. प्रसन्ना नकाते, डॉ. पुष्पा बुरुटे, डॉ. नेताजी पाटील, डॉ. योगेंद्र शेळके, डॉ. अमर बारवाडे, डॉ. प्रशांत मूल्ल्या उपस्थित होते. आता भविष्यात दोन्ही संस्थातर्फे विविध प्रकल्प संयुक्तरीत्या राबविण्यात येईल.

## डॉ. येल्लोजीराव मिरजकर यांचे विद्यार्थ्यांना आरोग्यमय दीर्घायुष्य लाभण्यासाठी मार्गदर्शन

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे ‘आहार क्रांती – उत्तम आहार उत्तम विचार’ या उपक्रमाची सुरुवात २०२१ साली करण्यात आली. पौष्टिक संतुलित आहाराबद्दल जागरूकता निर्माण करणे, परिसरातच सहज आणि स्वस्त उपलब्ध असलेली फळे आणि भाज्यांचे महत्त्व समजून घेऊन त्यांचा आहारात समावेश करण्याबाबत जनजागृती करणे, तसेच ‘कुपोषण आणि तज्जन्य आजार’ ह्या भारत देशात निर्माण झालेल्या समस्येचे निराकरण करणे हे ह्या उपक्रमाचे मूळ उद्देश आहेत.

‘ग्लोबल इंडियन सायंटिस्ट्स अँड टेक्नोक्रॅट्स फोरम (GIST)’ ही आंतरराष्ट्रीय संस्था ह्या उपक्रमात सहभागी असून GIST मध्ये जगभरातील भारतीय शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, अभियंते यांचा समावेश आहे. आपल्या देशाच्या विकासासाठी यातील अनेक तज्ज्ञ आपले ज्ञान आणि अनुभव यांचे योगदान देण्यास उत्सुक असतात आणि म्हणूनच या फोरमद्वारे भारतात आहार क्रांती घडविण्याचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम त्यांनी हाती घेतला आहे.

GIST फोरमचे आंतरराष्ट्रीय संयोजक डॉ. येल्लोजीराव मिरजकर (अमेरिका) व सचिव श्री. नंदकुमार पालकर यांनी नुकतीच श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टला भेट देऊन विविध प्राकल्पांची पाहणी केली व संस्थेच्या शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. डॉ. येल्लोजीराव मिरजकर यांनी विद्यार्थ्यांना सुखी व आरोग्यमय दीर्घयुष्य लाभण्यासाठी संतुलित पौष्टिक आहार व व्यायामाचे महत्त्व स्पष्ट केले. उत्तम आरोग्यासाठी आवश्यक जीवनशैलीबद्दल बोलताना त्यांनी प्रमुख तीन गुंतवणुकीची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली – Physical Wellbeing (आरोग्य संपदा), Financial Wellbeing (आर्थिक संपदा) आणि Social Wellbeing (सामाजिक/मानसिक संपदा). आर्थिक सुबत्ता असूनही शारीरिक व मानसिक स्वास्थ्य नसेल तर त्या पैशाचा काही उपयोग होत नाही. पण या सर्वापेक्षाही Cognitive Skills (संज्ञानात्मक कौशल्ये) फार महत्त्वाची असतात. आपल्या पाच ज्ञानेन्द्रियांनी आपल्या मेंदूला पुरविलेल्या माहितीला स्पष्ट करून, मेंदूद्वारे पाच ज्ञानेंद्रियांना व्यक्त करण्याच्या क्षमतेला संज्ञानात्मक कौशल्ये म्हणतात.

शारीरिक, मानसिक स्वास्थ्य आणि आर्थिक सुबत्ता प्राप्त



डॉ. येल्लोजीराव मिरजकर - विद्यार्थ्यांशी संवाद




डॉ. येल्लोजीराव मिरजकर भाषण देताना

करण्यासाठी संज्ञानात्मक कौशल्याचा विकास महत्त्वाचा ठरतो. Cognitive Skills चा स्रोत मेंदू आहे आणि अन्न व Cognitive Skills यांचा थेट संबंध असतो म्हणूनच अन्न आपल्या स्वास्थ्यासाठी आवश्यक असते.

सकाळी ताजा बनवलेला नाश्ता खाण्याचे महत्त्व सांगताना आपल्या आतड्यातील बॅक्टेरिया (Gut Bacteria)चे अन्न पचनातील बहुमूल्य कार्य त्यांनी विशद केले. हे Gut bacteria आपले मित्र असून त्यांची काळजी घेतली तर आपले आरोग्य चांगले राहील. आपण खाल्लेल्या अन्नातला काही भाग तेही खात असतात आणि त्या बदल्यात आपल्याला अन्नपचनाला मदत करतात. आपण जर रात्रीच्या जेवणानंतर सकाळी नाश्ताच केला नाही तर हे Gut Bacteria आपल्या शरीरातील साठवलेलं अन्न खायला सुरुवात करतात आणि आपली तब्येत खालावते.

पुढे श्री. मिरजकर यांनी मुलांना मोठ्या माणसांचे ऐकण्याचा सल्ला दिला. आपले पालक, शिक्षक अनुभवातून आपल्या भल्याचाच विचार करून आपल्याला सांगतात, तेव्हा त्यांचे ऐकले पाहिजे. याचे कारण सांगताना श्री. मिरजकर म्हणाले की आपल्या मेंदूची पूर्ण वाढ ही २१ ते २४ वयापर्यंत होत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्याला कळत नसेल तरीही मोठ्यांचे ऐकले पाहिजे.

विद्यार्थ्यांना मॅगी, चिप्स, कुरकुरे आवडतात. असे शिजलेले पाकीटबंद पदार्थ महिनोन्महिने खराब होत नाहीत याचे कारण विचारले असता विद्यार्थ्यांनी Preservative मिसळलेले असल्याचे सांगितले. हे Preservative जिवाणूंना मारते म्हणून हे तयार अन्न खराब होत नाही असेही विद्यार्थ्यांनी सांगितले. तेव्हा श्री. मिरजकर यांनी हेच Preservative आपल्या पोटात गेल्यावर आपल्या Gut Bacteria लाही मारते हे योग्य आहे का? असे विचारल्यावर विद्यार्थी अंतर्मुख झाले.

डॉ. मिरजकर यांनी Gut Bacteriaच्या प्रभावाचा अभ्यास करणारे संशोधन विद्यार्थ्यांना सांगितले. एक अतिक्रियाशील उंदीर आणि एक सामान्य उंदीर यांच्या Gut Bacteria ची अदलाबदल केल्यावर त्या उंदरांच्या वृत्तीतही अदलाबदल झाल्याचे दिसून आले. असाच प्रयोग माश्यांवर करून माशीमध्येही हाच निष्कर्ष निघाल्याचे सांगितले. याचा अर्थ आपल्या Smartness वर Gut Bacteria चा प्रभाव असतो. यावरून त्यांचे महत्त्व लक्षात येते.
विद्यार्थ्यांना डॉ. मिरजकर यांनी ताजे घरी शिजवलेले अन्न, भाज्या, फळे, लोणी, तुप असे विविध अन्न घटकांनी युक्त अन्न तसेच कारली, मेथीसारख्या कडू भाज्याही खाण्याचे फायदे सांगितले.

आपण अन्न कशासाठी खावे १) आपल्या शरीराचे पोषण करण्यासाठी २) आपला मित्र Gut Bacteria ला जगवण्यासाठी आणि ३) अन्न हे औषध समजून खावे नाहीतर औषधच आपले अन्न होईल - अशी तीन कारणे सांगून विद्यार्थ्यांकडून ती वदवून घेऊन डॉ. मिरजकर यांनी व्याख्यानाला पूर्णविराम दिला. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन 'उत्तम आहार - उत्तम विचार - उत्तम आरोग्याचे' महत्व पटवून दिले.



डॉ. येल्लोजीराव मिरजकर - विद्यार्थ्यांशी संवाद

# डॉक्टर हेमा पुरंदरे यांचे कर्करोग, अनुवांशिक आजार आणि जिनोमिक्स यावर व्याख्यान



*डॉ. हेमा पुरंदरे, वैद्यकीय संचालक डॉ. सुवर्णा पाटील, रेडिओलॉजिस्ट डॉ. नेताजी पाटील, अधिष्ठाता डॉ. मानसिंग घाटगे आणि इतर विभागातील प्राध्यापक तसेच विद्यार्थी*

दि.१९.०७.२०२४ रोजी भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात डॉ. हेमा पुरंदरे यांनी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'कर्करोग, अनुवंशिकता आणि जीनोमिक हेल्थकेअरची भूमिका' यावर व्याख्यान दिले. कार्यक्रमाची सुरुवात शरीररचनाशास्त्राचे प्राध्यापक डॉ. प्रशांत मूल्या यांच्या प्रास्ताविक भाषणाने झाली. त्यांनी डॉ. पुरंदरे यांचा परिचय करून देत भारतातील जनुकीय आरोग्यसेवेतील त्यांच्या अग्रगण्य योगदानावर प्रकाश टाकला.

आजच्या घडीला विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आपल्याला शरीरातल्या नानाविध प्रणालींच्या जनुकीय आजारांच्या मूळ कारणाचा शोध लागू शकतो. हे आजार आनुवंशिक असू शकतात आणि अगदी गर्भावस्थेपासून उतारवयापर्यंत कधीही होऊ शकतात. जमेची बाजू ही की ह्या आजारांचे निदान झाले की व्यवस्थापन करणे शक्य असते. त्यामुळे लवकरात लवकर ह्या संदर्भातल्या चाचण्या करून घेणे अतिशय आवश्यक असते; कारण त्याद्वारे आपण पुढच्या पिढीकडे होणाऱ्या अशा आनुवंशिक आजारांचे संक्रमण रोखू शकतो. तसेच आजाराची पूर्वकल्पना आली तर त्यानुसार आपली औषधयोजना, आहार-विहार आणि मुख्य म्हणजे करिअर ठरवू शकतो आणि आयुष्य जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीने जगू शकतो.

गरोदर महिलांनी गर्भारपणातील नेहमीच्या सोनोग्राफीसारख्या चाचण्यात गर्भाच्या वाढीबाबत डॉक्टरना काही शंका आल्यास त्यांच्या सल्ल्याने ताबडतोब जनुकीयतज्ज्ञाची भेट घ्यावी. जर पतिपत्नीमध्ये रक्ताचे नाते असेल तर गर्भासाठी जनुकीय दोषांचा धोका वाढतो. अशा जोडप्यांनी आपल्या नात्याबद्दल डॉक्टरांना स्पष्ट कल्पना द्यावी. नवजात शिशुच्या चाचण्यांद्वारे निदान होणाऱ्या काही आजारांवर आता ठोस उपाययोजनाही उपलब्ध आहे. ह्यामुळे संबधित कुठलीही लक्षणे आढळण्यापूर्वीच आपण योग्य पावले उचलू शकतो आणि आजारामुळे पुढे निर्माण होणारी शारीरिक आणि बौद्धिक व्यंगे टाळू शकतो.

जनुकीय चाचण्यांचा अविभाज्य भाग म्हणजे जनुकीय समुपदेशन किंवा जेनेटिक काउंसिलिंग. ह्यामध्ये टेस्टच्या आधी रुग्णांचे इतर वैद्यकीय रिपोर्ट्स पडताळले जातात आणि रुग्णांशी आणि त्याच्या कुटुंबीयांशी बोलून त्यांच्या तीन पिढ्यांच्या वैद्यकीय इतिहास जाणून घेतला जातो. ह्या आधारे समुपदेशकाला आजाराच्या निदानासाठी योग्य चाचणीची निवड करता येते आणि त्या चाचणीचे सर्व फायदे तोटे रुग्णाला समजावता येतात.

डॉ. पुरंदरे यांनी प्राध्यापकांना बॅचलर ऑफ जेनेटिक कौन्सिलिंग इंडिया (बी.जी.सी.आय.)कडे नोंदणी करण्याचे आवाहन केले आणि जनुकीय समुपदेशन ही भविष्यातील उपचारपद्धती असेल यावर भर दिला. त्यांनी भारतात उपलब्ध असलेल्या सुविधा आणि चाचण्यांवर प्रकाश टाकला आणि संस्थेत जनुकीय समुपदेशन प्रयोगशाळा सुरू करण्याचा उपक्रम प्रेक्षकांनी उत्साहाने स्वीकारला. डॉ. पुरंदरे यांनी दिलेल्या माहितीबद्दल सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. पुरंदरे यांच्या सादरीकरणामुळे केवळ श्रोत्यांचे प्रबोधन झाले नाही तर आनुवंशिक समुपदेशन आणि चाचण्या आणि त्यांच्या क्लिनिकल पद्धती यात शिक्षण घेण्यासाठीही सर्वांना प्रेरित केले.

वैद्यकीय संचालक डॉ. सुवर्णा पाटील, रेडिओलॉजिस्ट डॉ. नेताजी पाटील, अधिष्ठाता डॉ. मानसिंग घाटगे आणि इतर विभागातील प्राध्यापक, सर्व स्तरांतील विभागप्रमुख व विद्याशाखांचे प्रमुख या कार्यशाळाला उपस्थित होते. डॉ. हेमा पुरंदरे यांच्या भेटीने भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात जनुकीय आरोग्य शिक्षणाच्या नव्या अध्यायाची सुरुवात झाली.

# संतोष कुंभार गंभीर अपघातातून पुन्हा स्वत:च्या पायावर उभे राहिले !



*श्री. संतोष कुंभार उपचार करणाऱ्या वैद्यकीय पथकाबरोबर*

४४ वर्षीय संतोष कुंभार यांचा २ जुलै २०२४ला पहाटे ३:३० वाजता मुंबईला रस्त्यावर चालत असताना, एका टॅक्सीने धडक दिल्यामुळे भीषण अपघात झाला. तेव्हा यांना तातडीने के. ई.एम. रुग्णालयात नेले गेले. तिकडे प्राथमिक तपासणीमध्ये डाव्या पायाची दोन्ही मोठी लांब हाडे, उजव्या हाताच्या मनगटाजवळील हाड पूर्णपणे तुटलेले होते, तसेच छातीच्या सर्व बरगड्या आणि उजव्या पायाचे हाडसुद्धा तुटलेले आहे असे आढळले. त्यानंतर रुग्णाला मुंबईतील खाजगी रुग्णालयामध्ये हलवण्यात आले.

तिथे डॉक्टरांनी केलेल्या काही तपासण्यांनंतर असे आढळून आले की रुग्णाच्या डाव्या पायाच्या रक्तवाहिनीमध्ये मोठी रक्ताची गुठळीदेखील आहे, आणि त्यामुळे तेथील डॉक्टरांनी संतोषच्या नातेवाइकांना शस्त्रक्रिया करण्यास मोठ्या रुग्णालयात (Tertiary care hospital) घेऊन जाण्याचा सल्ला दिला.

रुग्णाला त्यांच्या नातेवाइकांनी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयामध्ये हलवण्याचा निर्णय दि. ८ जुलै २०२४ला घेतला आणि मध्यरात्री १२:४५ वाजता मुंबईहून निघून पहाटे रुग्ण वालावलकर रुग्णालयात दाखल झाला. संतोषला भ.क.ल. वालावलकर रुग्णालयामध्ये अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले.

तेथे विविध विभागातील डॉक्टरांच्या निर्देशनाखाली (अस्थिरोग तज्ज्ञ, मेडिसिन, शल्यचिकित्सा, पल्मोलॉजिस्ट, भूलतज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अनिष पॉल, डॉ. ओंकार, डॉ. जतीन, भूलतज्ज्ञ डॉ. लिना आणि अस्मिता) यांच्या एकत्रित विचारविनिमयाने रुग्णाची परिस्थिती स्थिर करण्यात आली. ऑपरेशन करण्याआधी बरगड्यांच्या फ्रॅक्चरमुळे फुफ्फुसाला इजा होऊ नये म्हणून फुफ्फुसात नळी घालून ते सुरक्षित राहील याची काळजी घेतली गेली. तात्पुरत्या स्वरूपात पायातील रक्ताची गुठळी विरघळणारी औषधे ऑपरेशनसाठी थांबविण्यात आली.

रुग्ण शस्त्रक्रियेसाठी फिट झाल्यानंतर रुग्णाची दि. ११ जुलै २०२४ला शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि किमान सात तास डॉक्टरांचे दोन चमू, एक हाताची आणि दुसरा पायाची शास्त्रकिया करीत होता. छातीला लागलेल्या गंभीर मारामुळे जनरल अनेस्थेशियामध्ये शस्त्रक्रिया करणे शक्य नसल्याने संतोषची स्पायनल+ रिजनल ॲनेस्थेशिया देऊन शस्त्रक्रिया करण्यात आली. तो पूर्णपणे शुद्धीत असताना ही ऑपरेशन्स केली गेली. पायातील रक्ताची गुठळी सटकून फुफ्फुसाकडे जाऊन दम लागू शकतो. याकरता विशेष औषधे दिली गेली. दुसऱ्या दिवशी फुफ्फुसातील नळी काढून टाकण्यात आली आणि शस्त्रक्रियेनंतर संतोषकडे बारकाईने लक्ष देण्याची गरज असल्यामुळे अतिदक्षता विभागातच ठेवण्यात आले. काही दिवसातच संतोषची लक्षणीय प्रगती होऊन त्याला सुखरूपपणे घरी जाण्यास परवानगी दिली आणि व्यायाम करण्याचा सल्ला दिला गेला. वालावलकर रुग्णालयातील विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या एकत्रित जलद निर्णयामुळे आणि अद्ययावत सुविधांमुळे संतोष सुखरूप घरी जाऊ शकले म्हणून त्यांनी रुग्णालयाचे आभार मानले. संतोष हे गुहागर येथील वेळंब गावातील रहिवासी असून नोकरीनिमित्त ते मुंबईत राहत होते; पण आपल्या कोकणात वालावलकर रुग्णालयात त्यांना योग्य उपचार मिळाले याबद्दल ते अधिक समाधानी आहेत.

# भ. क. ल. ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात Medtech Workshop चे आयोजन




*डॉ. निरंजन खांबेटे वैद्यकीय विद्यार्थ्यांशी संवाद साधताना*



*डॉ. निरंजन खांबेटे वैद्यकीय विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक दाखविताना*

एस.व्ही.जे.सी.टी. संस्थेत, सर्व अभ्यासक्रमात संशोधन आणि तंत्रज्ञान ह्याला खूप महत्त्व दिले आहे. विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, ती योग्यरीत्या वापरता यावी, तंत्रज्ञानात त्यांचे कुतूहल वाढावे ह्यासाठी संस्था सतत प्रयत्नशील असते. असाच एक उपक्रम भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात, दि. २० व २१ जुलै २०२४ रोजी, एम.बी.बी. एस. अभ्याक्रमाच्या तिसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आला. वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय उपकरणे योग्यरीत्या हाताळता यावी, त्याचे प्रयोजन काय, नवीन टेक्नॉलॉजी कुठल्या दिशेने अग्रेसर होत आहे, ह्यासाठी Medtech Workshop या प्रयोगशाळेचे आयोजन केले होते. एस.व्ही.जे.सी. टी.च्या समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युट (बायोमेडिकल डिपार्टमेंट)च्या सहयोगाने प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आली.

डॉ. निरंजन खांबेटे (मॅनेजर, क्लिनिकल इंजिनीअरिंग, दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे) व संस्थेच्या बायोमेडिकल डिपार्टमेंटचे प्रमुख प्रा. रोहन गुप्ते, ह्यांच्या संयुक्त प्रयत्नाने ह्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

दि. २० जुलै २०२४ रोजी विद्यार्थ्यांना, हॉस्पिटलमधील इलेक्ट्रिकल सिस्टिम, व्हेंटिलेटर्स, डिफिब्रिलेटर्स, कौट्री मशीन, सिरिंज पम्प, इनफ्युजन पम्प ह्याच्यावर प्रात्यक्षिक दाखविण्यात आले व विद्यार्थ्यांना ही उपकरणे कशी वापरावी, रुग्णाची व स्वतः ची सुरक्षा कशी घ्यावी ह्याची माहिती दिली गेली व त्यांना Hands on training चा अनुभव घेता आला.

दि. २१ जुलै २०२४ रोजी डॉ. निरंजन खांबेटे ह्यांनी भारतात बनणाऱ्या वैद्यकीय उपकरणांची माहिती देत, श्रीचित्रा इन्स्टिट्युट फॉर मेडिकल सायन्सेस अँड टेक्नॉलॉजी ह्या संस्थेची माहिती दिली. तांत्रिक आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन समस्या सोडविण्यावर भर दिला पाहिजे तरच त्यांना नवीन उपकरणांचा शोध लावता येईल. पुढे त्यांनी इ.सी.जी. मशीनचे प्रात्यक्षिक दाखवून त्यात येणाऱ्या चुका (Errors and Artifacts) कशा असतात आणि काय काळजी घेतली पाहिजे ह्याबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी स्वतः इ.सी.जी. मशीन वापरून पाहिले. नंतर त्यांनी इलेक्ट्रोसर्जिकल उपकरणांची माहिती दिली व ती योग्यरीत्या कशी वापरावीत आणि त्या उपकरणांमागचे कार्यतत्त्व काय ह्याची माहिती दिली.

ह्या २ दिवसांच्या प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व Hands on training मुळे अजून अशा कार्यशाळा झाल्या तर भाग घ्यायला आवडेल असा प्रतिसाद दिला. वैद्यकीय विद्यार्थ्यांना मेडिकलमधले फिजिक्स आणि इलेक्ट्रॉनिक्स जाणून घेण्याची ही संधी पुढील आयुष्यात उपकरणे वापरताना नक्कीच फायदेशीर ठरणार आहे.

# डॉ. स्मिता करगुटकर (आजगावकर) न्यू जर्सी, अमेरिका यांची वालावलकर रुग्णालयाला भेट



डॉ. स्मिता आजगावकर, डॉ. सुवर्णा पाटील यांच्यासमवेत वैद्यकीय विद्यार्थी

डॉ. स्मिता करगुटकर(आजगावकर), एमडी मेडिसिन (इडोक्रिनॉलॉजिस्ट), न्यू जर्सी, यांनी दि. २३ व २४ जुलै २०२४ रोजी सकाळी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाला आणि ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाला भेट दिली. तसेच त्यांनी वैद्यकीय पदव्युत्तर पदवी (एम.डी./एम.एस.)चे शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरांना थायरॉईड, पिट्यूटरी, मधुमेह, ॲलोपॅथी, आयुर्वेद, निसर्गोपचार, होमिओपॅथी आणि होलिस्टिक मेडिसिन या विषयावर भविष्याच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शन केले

# शालेय क्रीडा स्पर्धा सन २०२४- २५ आयोजन सभा

खेळाडूंची कारकीर्द ही नेहमीच शालेय स्पर्धांमधूनच सुरू होत असते यासाठीच त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन हाही तितकाच महत्त्वाचा भाग असतो. शालेय क्रीडा स्पर्धा सन २०२४-२५साठीच्या आयोजनाची सभा, क्रीडापटू आणि क्रीडा विश्वाच्या प्रगतीसाठी कायमच तत्पर असणाऱ्या श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या क्रीडासंकुलात आयोजित करण्यात आली होती. दि. २२ जुलै २०२४ रोजी आयोजित केलेल्या या सभेमध्ये वार्षिक शालेय क्रीडा स्पर्धांचे अतिशय नियोजनबद्ध वेळापत्रक तयार करण्यात आले. त्याचबरोबर विविध खेळांच्या बदललेल्या तांत्रिक निकषांविषयी तज्ज्ञांमार्फत क्रीडा शिक्षकांना माहिती देण्यात आली. रत्नागिरी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे सचिन मांडवकर यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ६० क्रीडाशिक्षक सहभागी झाले होते. जगभरातील क्रीडा विश्वाचे आकर्षण असणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धांमधील विविध क्रीडा प्रकारांमध्ये असणारा भारताचा सहभाग याविषयी सादरीकरण युनायटेड इंग्लिश स्कूलचे क्रीडाशिक्षक समीर कालेकर यांनी केले. ऑलिम्पिक स्पर्धांच्या अनुषंगाने विविध शाळांमध्ये चालविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती क्रीडाशिक्षकांनी सादर केली.



रत्नागिरी जिल्हा क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष उदयराज कळंबे यांचे स्वागत करताना तालुका अध्यक्ष राकेश खांडेकर



क्रीडा नियोजन सभेसाठी उपस्थित क्रीडाशिक्षक

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# दहावी भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर स्मृतिदौड २०२४

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे डेरवण येथे शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ८ वाजता क्रॉसकंट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेदरम्यान विजेत्या खेळाडूंना एकूण ५५,०००/- रुपयांची रोख पारितोषिके, पदके आणि प्रशस्तिपत्रके देऊन गौरविण्यात येणार आहे.

ही स्पर्धा १२/१४/१६/१८ वर्षे वयोगटातील मुले व मुलींसाठी आयोजित केली असून १२ वर्षे वयोगटातील मुले व मुली यांना २ किलोमीटर, १४ वर्षे वयोगटातील मुले यांना ३ किलोमीटर व मुली २ किलोमीटर, १६ वर्षे वयोगटातील मुले यांना ४ किलोमीटर व मुली ३ किलोमीटर तसेच १८ वर्षे वयोगटातील मुले यांना ६ किलोमीटर व मुली ४ किलोमीटर एवढे दौडअंतर असणारी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

तसेच सर्व सहभागी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी टी-शर्ट देण्यात येणार आहेत. तरी जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून बलोपासना आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे.

**सदर स्पर्धेतील आपला सहभाग नोंदविण्याची अंतिम तारीख २५ ऑगस्ट ही असून अधिक माहितीकरिता – ९८२२६३९३०६ / ९८२२००१६९२ / ९८५०८८३२८३ / ८८०५२२८९२२ / ९३२५८९७८७७ या क्रमांकांवर संपर्क साधावा.**




*संग्रहित छायाचित्र*

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले. Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५, सहसंपादक : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035